माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल केलेली तक्रार**

## क्र.मुमाआ/नों.क्र.१५०८ /२२ /त.क्र.०२ /२६/०१

श्रीम.जेनिफर रेबेलो
३०५ सूर्या, वासूडयू सी.एच.एस.,
७९ हिल रोड, वांद्रे (प), मुंबई – ४०००५०.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (विकास नियोजन)
एच/पश्चिम विभाग बृहन्मुंबई महानगरपालिका, प्रमुख अधिकारी
(विकास नियोजन) यांचे कार्यालय, महापालिका मुख्यालय,
५वा मजला, विस्तारीत इमारत, महापालिका मार्ग, मुंबई – ४००००१.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (दक्षता) एच विभाग
बृहन्मुंबई महानगरपालिका प्रमुखा अभियंता (दक्षता) यांचे कार्यालय,
इमारत क्र.०२ ए विंग नित्यानंद नगर, घाटकोपर अंधेरी लिंग रोड,
घाटकोपर (प.) मुंबई – ४०००८६.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.प्र.) एच विभाग
बृहन्मुंबई महानगरपालिका प्रमुख अभियंता (इ.प्र) प.उ.-०१ यांचे कार्यालय,
हिंदूह्दय सम्राट श्री. बाळासाहेब ठाकरे मंडई. ऑप जे.व्ही.एल.आर.
पूनस नगर, जोगेश्वरी (पूर्व) मुंबई – ४०००९३.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (विकास नियोजन)
'एच' व 'के' विभाग बृहन्मुंबई महानगरपालिका, प्रमुख अधिकारी
(विकास नियोजन) यांचे कार्यालय, महापालिका मुख्यालय,
५वा मजला, विस्तारीत इमारत, महापालिका मार्ग, मुंबई – ४००००१.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ०६.०१.२०२६**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

प्रस्तुत प्रकरणी तक्रारदार श्रीमती रिबेलो यांनी दिनांक ०६/०७/२०२२ रोजी अपील क्रमांक ३१५१/१९ यात पारित आदेशाचे अनुपालन झाले नसल्याचा आक्षेप नोंदवित **कलम १८** अन्वये प्रस्तुत तक्रार अर्ज दाखल केलेला आहे.

jyotsna

दिनांक ०६/०७/२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशात तत्कालीन माननीय आयुक्त यांनी चौकशी अहवालाची प्रत तात्काळ अपिलार्थींना देण्याविषयी निर्देश दिले होते. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (दक्षता) श्री.श्रीकांत भालेकर यांना असे निर्देश दिले होते की, नस्ती क्रमांक CH (BIG) ६३५ / बी दिनांक ३०/०७/२०१८ चा शोध घेऊन तक्रारदारांना पुढील ३० दिवसात निरीक्षणाची संधी देण्यात यावी व त्यांना हव्या असलेल्या माहितीच्या छायांकित प्रती नि:शुल्क देण्यात याव्यात.

तक्रारदार श्रीमती रिबेलो यांच्या म्हणण्यानुसार उपरोक्त आदेशाचे अनुपालन झाले नसल्याने तसेच त्यांना जाणून-बुजून माहिती नाकारण्यात आली असल्याने प्रस्तुत तक्रार अर्ज मंजूर करीत संबंधित जन माहिती अधिकारी जे महानगरपालिकेतील इमारत प्रस्ताव विभागातील इतर अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुद्ध **कलम १९ (८) (ग) व २० (१) व २० (२)** अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

याउलट तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकाऱ्यांनी या संदर्भात संबंधित धारिणी ही महानगरपालिकेच्या कार्यालयात उपलब्ध असून एकूण २०७ पृष्ठांची ही धारिणी असून त्याची एक प्रत आज देखील उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी दिनांक ०६/०७/२०२२ रोजीचा आदेश हा अतिशय स्वयंस्पष्ट असून त्याची अंमलबजावणी करण्यास प्राधिकरणाने तात्काळ तयारी दर्शविली असून त्यांच्या म्हणण्यानुसार श्रीमती रिबेलो यांचे प्रतिनिधी यांनी फक्त नस्तीचे अवलोकन देखील केले असून यातील सर्वच कागदपत्र त्यांच्याकडे असल्याचे नमूद करीत कुठलाही दस्तऐवज स्वीकारण्यास नकार दिला होता.

या उलट श्रीमती रिबेलो यांच्या म्हणण्यानुसार वरील नस्तीतील अनेक महत्त्वाची कागदपत्रे गहाळ झाली असून या बाबीचा तत्कालीन जन माहिती अधिकारी व अपिलिय अधिकाऱ्यांनी ठाम शब्दात विरोध केला असून महानगरपालिकेच्या कार्यासनात **कलम दोन (च)** प्रमाणे उपलब्ध असलेली व तक्रारदारांना अपेक्षित असणारी, दक्षता विभागाने तत्कालीन माननीय आयुक्त यांना पाठविलेल्या अहवालाची व इतर कागदपत्रांची उपलब्ध असलेली नस्ती ही २०७ पानांची असून वरील संपूर्ण नस्तीची छायांकित प्रत माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये पुरविण्यात आलेली माहिती ही माहिती अधिकाराच्या शिक्यासह व माहिती अधिकाराच्या लोगोसह तसेच विद्यमान जन माहिती अधिकाऱ्यांनी देण्यात येत असणारी माहिती ही पूर्णपणे मूळ नस्तीनुसार असून या व्यतिरिक्त या धारिणीत इतर कुठलीही कागदपत्रे नसल्याचे प्रतिज्ञापत्र स्वरूपातील निवेदन तक्रारदारांना देण्याच्या निर्देशासह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

तक्रारदार श्रीमती रिबेलो यांनी या संदर्भात वांद्रे पोलीस स्थानक तसेच आयोगात दिनांक १८ डिसेंबर, २०२५ रोजी एक अतिरिक्त तक्रार दाखल केली असून यात त्यांना अपेक्षित असणाऱ्या माहितीची काही कागदपत्रे ही गहाळ करण्यात आली असून त्या संदर्भात गुन्हा दाखल करावा अशी विनंती करण्यात आलेली

आहे. तसेच कलम १८ अन्वये याबाबत चौकशीचे आदेश देण्याची विनंती ही त्यांनी केलेली असून प्रस्तुत प्रकरणी महानगरपालिकेच्या काही कर्मचारी/ अधिकाऱ्यांची/ विकासकांची पाठराखण करण्याच्या हेतूने मूळ दस्तऐवज हे गहाळ केले असून महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ यातील **कलम ९** नुसार यात प्रथम दर्शनी अहवाल दाखल करणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.

प्रस्तुत प्रकरणी विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी या संदर्भात कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली व **कलम दोन (च)** प्रमाणे देय असलेली संपूर्ण धारिणी आयोगात हजर केली असल्याने तक्रारदार यांच्या या तक्रार अर्जावर कुठलेही आदेश पारित करण्याची सद्य:स्थितीत तरी आवश्यकताआढळून येत नाही.

वर निर्देशित केल्याप्रमाणे उपलब्ध असलेल्या धारिणीची संपूर्ण प्रत ही तक्रारदार यांना **विनामूल्य** देण्याच्या निर्देशासह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**१.वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२.वरील तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission Maharashtra

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : ०६.०१.२०२६**

jyotsna